क्र.साप्रवि/सेप्र/न.क्र.४१/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. २६४ दिनांक ०४ / १२ / २००९

विषय : प्रकल्पग्रस्तांना असलेल्या ५% समांतर आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू करणेबाबत.

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३६१, दिनांक १४/०६/२००१.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. २४७, दिनांक ०८/०९/२००९

-----

निगम कार्यालयाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. २४७, दिनांक ०८/०९/२००९ अन्वये भूमिसंपादनामुळे बाधित झालेल्या व्यक्तींना/नामनिर्देशितांना कंपनीत नोकरी देणे संदर्भात मागदर्शक तत्त्वे विहित करुन त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट २००९ नुसार मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी याचिका क्रमांक ५४५२/२००८ व ५२६६/२००८ यावर एकत्रितपणे सुनावणी घेऊन प्रकल्पग्रस्तांच्या ५% आरक्षणामध्ये भूकंपग्रस्तांचा समावेश करु नये. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना असलेले ५% समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखुन ठेवुन या आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढुन भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे असे निर्देश दिलेले आहेत.

२. शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट २००९ ची प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. सर्व संबंधितांना विनंती करण्यारत येते की महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या सर्व नियुक्ति अधिकाऱ्यांनी संबंधित शासन निर्णयाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकत स्थळावर उपलब्ध आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

(सु.य.पाटील)
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत :
म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादितच्या विभागीय कार्यालय व त्यावरील सर्व स्तरापर्यंत.

C:\RC\File-४१.doc

प्रकल्पग्रस्तांना असलेल्या ५% समांतर
आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण
काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ % समांतर
आरक्षण लागू करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक: भूकंप-२००९/प्र.क्र. २०७/२००९/१६-अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ ऑगस्ट, २००९

वाचा :- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:- एईएम-१०८०/३५ / १६-अ,दिनांक २१.१.१९८०,
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:- एसआरव्ही-१०९४/ १००४/प्र.क्र.३०/९४/१६-अ, दिनांक १७.११.१९९४,
(३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक:-इक्यूआर-१०९४ / प्र.क्र.७६८ / भूपुक-१,दिनांक ९.८.१९९५.

**प्रस्तावना :**

वरील संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय, दिनांक २१.१.१९८० अन्वये प्रकल्पग्रस्त व्यक्ति व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तिंना शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्ती देण्यासाठी एकूण जागांच्या किमान ५% जागांवर सर्वोच्च प्राथम्य देण्यात आलेले आहे.

संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णय दिनांक १७.११.१९९४ अन्वये प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या ५% समांतर आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांनाही आरक्षणाची सवलत देण्यात आलेली आहे. प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त यांना संयुक्तपणे ५% समांतर आरक्षण ठेवण्यात आल्याने उपलब्ध होणाऱ्या ५ जागांपैकी ३ जागांवर भूकंपग्रस्त व २ जागांवर प्रकल्पग्रस्त या प्रमाणात नियुक्त्या द्याव्यात असे आदेश संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णय दिनांक ९.८.१९९५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी याचिका क्र. ५४५२/२००८ व ५२६६/२००८ यावर एकत्रितपणे सुनावणी घेऊन दिनांक २१.११.२००८ रोजी प्रकल्पग्रस्तांच्या ५% आरक्षणामध्ये भूकंपगस्तांचा समावेश करुन कोणतीही पद भरती करु नये असे अंतरिम आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना असलेले ५% समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून या समांतर आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे समांतर आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रकल्पग्रस्तांना असलेले ५% समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून या आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना तात्काळ द्याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९०८२७१४३००९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दि. रा. डिंगळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
शासकीय अभियोक्ता, उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.
* (पत्राने)